॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
**श्री शारदा रोपवाटिका**
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**विकास वॉटरप्रूफिंग**
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रूफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २३८ वा | गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# पेशवे लढले व शिवरायांचं नाव झालं असं हरामखोर आनंद स्वरुप म्हणाला...!

## बहुजनांच्या महापुरुषांचा जाणीवपूर्वक अपमान करणाऱ्या औरंगजेबाच्या औलादींना टकमक टोकावरून फेकून द्या

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजांबाबत हरामखोर आनंद स्वरुप या स्वयंघोषित बाबानं वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. पेशवे लढले आणि शिवरायांचं नाव झालं असं वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. हा हरामखोर एवढ्यावरच थांबला नाही तर लिंगपिसाट धीरेंद्र बागेश्वर जे म्हणाला त्याचं समर्थनही त्यांन केलं आहे.

धीरेंद्र बागेश्वर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त वक्तव्य करुन दोन दिवस उलटत नाही तोच आणखी एका स्वयंघोषित बाबानं छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. आनंद स्वरुप यांनी धीरेंद्र बागेश्वर याचं समर्थन करताना शिवरायांबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं आहे.

**आनंद स्वरुप यांनी काय म्हटलं आहे?**

"युद्ध पेशवे लढले आणि नाव शिवरायांचं झालं. शिवरायांनी कधी युद्ध मैदानात लढलं नाही तर फक्त छापामार युद्ध लढले. पेशव्यांनी मात्र युद्धाच्या मैदानात लढाई केली. धीरेंद्र बागेश्वर जे बोलला त्याचं मी शब्दशः समर्थन करतो. त्यांनी माफी मागायची गरज नव्हती. पेशव्यांना यासाठी उपेक्षित ठेवलं गेलं कारण ते ब्राह्मण होते. आज पंतप्रधान



नरेंद्र मोदींना ट्विट करायला वेळ मिळणार नाही. विश्वातले महान योद्धा, ब्राह्मण शिरोमणी बाजीराव



बल्लाळ यांना पुण्यतिथीदिनी शत शत नमन," असं त्यांनी पोस्टमध्ये लिहिलं आहे.

**हर्षवर्धन सपकाळांनी या नालायकाचा घेतला समाचार**

आनंद स्वरुपांच्या या वादग्रस्त वक्तव्याचा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांनी कठोर शब्दात समाचार घेतलाय. शिवरायांच्या शौर्याचा अपमान आनंद स्वरुप यांनी केल्याचा आरोप सपकाळांनी केला आहे.

राष्ट्रवादी शरद पवार पक्षानंही आनंद स्वरुप याच्यावर गंभीर आरोप केला आहे. आनंद स्वरुप हा एका राजकीय पक्षाचं काम करतोय त्या पक्षाचीही तशीच भूमिका आहे का असा सवाल राष्ट्रवादी शरद पवार पक्षानं उपस्थित केला आहे.

**बागेश्वरानही केलं होतं वादग्रस्त विधान**

याआधी बागेश्वरान छत्रपती शिवाजी महाराजांसदर्भात वादग्रस्त विधान केलं होतं, ज्यासाठी त्यांना माफीही मागावी लागली. छत्रपती शिवाजी महाराज युद्ध करताना थकले, त्यानंतर एक दिवस ते समर्थ रामदासांकडे गेले आणि म्हणाले आपण खूप युद्ध लढलो, आता हे राज्य तुम्हीच सांभाळा. पुढचे काही दिवस मला काहीच करण्याची इच्छा नाही असं विधान बागेश्वर बाबांनी केलं. शिवाजी महाराज आणि समर्थ रामदासांच्या भेटीचा संदर्भ देऊन त्यांनी नागपुरात हे विधान केलं होतं. बहुजनांच्या महापुरुषांचा जाणीवपूर्वक अपमान करणाऱ्या औरंगजेबाच्या औलादींना टकमक टोकावरून फेकून देण्याची मागणी महाराष्ट्रातील तमाम जनता करत आहे.

प्रवचनकारांनी समाज प्रबोधनाचं काम करणं अपेक्षित आहे. पण गेल्या काही दिवसांपासून कथित संत समाजप्रबोधन करण्याऐवजी इतिहासात लुडबूड करुन वाद निर्माण करताना दिसतायेत हे खेदानं म्हणावं लागेल.

## सोलापूर जिल्हा बँकेची पीककर्ज वाटपात आघाडी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याची आर्थिक वाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पीक कर्जवाटपात सातत्याने प्रगती केली आहे. प्रशासकांच्या कार्यकाळात बँकेच्या कर्जवाटपाचा आकडा वाढला असून, अन्य बँकांच्या तुलनेत जिल्हा बँकेने पीककर्ज वाटपात आघाडी घेतली आहे. त्यामुळे बँक आता खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून काम करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



जिल्हा बँकेची सर्वांत मोठी ताकद म्हणजे ग्रामीण भागात पसरलेले शाखांचे जाळे, याच ताकदीच्या जोरावर बँकेने शेती क्षेत्राला मोठे आर्थिक पाठबळ दिले आहे. जिथे अनेक राष्ट्रीयीकृत आणि खासगी बँका केवळ मोठ्या व सधन शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यास प्राधान्य देतात, तिथे जिल्हा बँक आजही सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी हक्काचा पतपुरवठादार ठरली आहे. गेल्या पाच वर्षांत बँकेने दिलेले उद्दिष्ट ओलांडून अधिक कर्जपुरवठा करण्याची कामगिरी सातत्याने केली आहे.

खरीप हंगामातही बँकेचा सिंहाचा वाटा एकेकाळी रब्बी हंगामासाठी ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात आता खरीप पिकांचे क्षेत्रही लक्षणीयरीत्या वाढले आहे. या बदलाचा स्वीकार करत जिल्हा बँकेने खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात बँकेला १४०२ कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले होते, त्यापैकी १३७० कोटी रुपयांचे विक्रमी वाटप करण्यात आले आहे. आगामी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीच्या पतपुरवठा आराखड्यात जिल्हा बँकेला नेमके किती कोटींचे उद्दिष्ट मिळते आणि बँक ते कसे पूर्ण करते, याकडे आता जिल्ह्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

**गेल्या सात वर्षांतील पीक कर्ज वाटपाचा आढावा**

आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये बँकेने ३६,६४६ शेतकऱ्यांना ३२१ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले होते, तर त्यावेळी येणे बाकी ११७२ कोटी रुपये होती. त्यानंतर २०२०-२१ मध्ये ४०१ कोटी रुपयांचे कर्जवाटप ४१,९०९ शेतकऱ्यांना करण्यात आले (येणे बाकी १२६७ कोटी), तर २०२१-२२ या वर्षात हे प्रमाण वाढून ७३१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आणि लाभार्थ्यांची संख्या ६४,५०७ इतकी होती (येणे बाकी १४२३ कोटी). २०२२-२३ या वर्षात बँकेने मोठी झेप घेत ८५,२५३ शेतकऱ्यांना ११२६ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले (येणे बाकी १७३७ कोटी). २०२३-२४ या काळात ८१,६८० शेतकऱ्यांना ११६६ कोटी रुपयांचे वाटप झाले असून येणे बाकी १८८९ कोटी रुपये नोंदवली गेली.

त्यानंतर २०२४-२५ मध्ये ८७,८६३ शेतकऱ्यांना १३०९ कोटी रुपये पीक कर्ज वाटप करण्यात आले (येणे बाकी २०८८ कोटी) आणि २०२५-२६ या ताज्या आर्थिक वर्षात बँकेने ९१,२६८ शेतकऱ्यांना १३७० कोटी रुपयांचे सर्वाधिक कर्जवाटप केले असून, बँकेची एकूण येणे बाकी २२१४ कोटी रुपये इतकी राहिली आहे.

## रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांची मंगळवारी जाहीर सभा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** तथागत गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष आनंदराज आंबेडकर हे मंगळवार दि. 5 मे 2026 रोजी सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. यावेळी पदाधिकाऱ्यांशी चर्चा तसेच जाहीर सभा होणार आहे, अशी माहिती सोलापूर जिल्हा प्रभारी सिद्धार्थ कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यानिमित्ताने आनंदराज आंबेडकर यांची सोलापुरातील जुना देगाव नाका येथील बी. आर. क्रीडा युवक मंडळाच्या प्रांगणामध्ये मंगळवारी 5 मे रोजी सायंकाळी 6 वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या दौऱ्यात ते रिपब्लिकन सेनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत. त्याचबरोबर सोलापूर शहर जिल्ह्यातील विविध प्रश्न आणि समस्या जाणून घेणार आहेत. या सभेचे आयोजन बी. आर. क्रीडा मंडळाचे व्यवस्थापक दीपक आव्हाड आणि रिपब्लिकन सेना जिल्हा प्रभारी सिद्धार्थ कांबळे यांच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सिद्धार्थ कांबळे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस सुबोध सोनकांबळे, बाळासाहेब दुपारगुडे, भीमराय बिराजदार, नागेश भालेराव आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिनापासून मराठी सक्ती; टॅक्सी-रिक्षा चालकांना धडे देणार


### 15 ऑगस्टपर्यंत विशेष मोहीम

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांना 1 मे अर्थात महाराष्ट्र दिनापासून मराठी सक्तीची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाणार आहे. तूर्त भाषेसाठी परवाना रद्द होणार नाही, पण 1 मे ते 15 ऑगस्टदरम्यान परिवहन विभागाकडून विशेष पडताळणी मोहीम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या 100 दिवसांच्या काळात आरटीओकडून रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठीचे धडे दिले जाणार आहेत. रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी 20 कलमी नियमावली बनवण्यात आली असून तिचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा सरकारने दिला आहे.

परिवहन भवन येथे आज झालेल्या बैठकीनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत यासंदर्भात माहिती दिली. केवळ मराठी भाषेच्या सक्तीवरून कारवाई होणार नसून परिवहन विभागाने नेमून दिलेल्या 20 कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या मुजोर चालकांवरही कारवाई होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर आणि अतिरिक्त परिवहन आयुक्त रवींद्र गायकवाड आदी उपस्थित होते.

रिक्षा-टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत सर्व संघटनांनी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण पाठिंबा दर्शविला आहे. महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर मराठी भाषा येणे आवश्यक आहे, ही भूमिका सर्वांनी मान्य केल्याचे सरनाईक यांनी सांगितले.



**सर्व आरटीओंना विशेष तपासणीचे निर्देश**

राज्यातील सर्व 59 आरटीओंना 1 मेपासून विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परिवहन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या चालकांवर कडक कारवाई केली जाणार आहे, असे सरनाईक यांनी सांगितले.

**विशेष समितीकडून नियमित आढावा**

1 मेपासून राबवण्यात येणाऱ्या विशेष पडताळणी मोहिमेचे नेतृत्व अतिरिक्त परिवहन आयुक्त रवींद्र गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीकडे सोपविण्यात आले आहे. ती समिती दररोज तसेच साप्ताहिक पातळीवर या मोहिमेचा आढावा घेईल आणि आरटीओंच्या अहवालांच्या आधारे पुढील कारवाईबाबत निर्देश देईल, असे सरनाईक यांनी नमूद केले. मोहिमेनंतर 16 ऑगस्ट रोजी सर्वंकष अहवाल सादर करण्यात येईल आणि पुढील धोरणात्मक निर्णय घेतले जातील, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

**मराठी शिकण्यासाठी पुस्तिका देणार**

मराठी शिकण्यासाठी इच्छुक चालकांसाठी आरटीओ कार्यालयांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. 'कोकण मराठी साहित्य परिषद' आणि 'मुंबई मराठी साहित्य संघ' यांच्या सहकार्याने त्यांना मराठीची शिकवणी दिली जाणार आहे. तसेच मराठी शिकण्यासाठी पुस्तिका व ई-पुस्तिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मराठी भाषा शिकलेल्या चालकांना राज्य शासनामार्फत प्रमाणपत्रही देण्यात येणार असून परवाना नूतनीकरण करताना हे प्रमाणपत्र आवश्यक राहील, अशी माहितीही सरनाईक यांनी दिली.

**महाराष्ट्रात मराठी बोलण्याचे बंधन कायद्यानेच आहे**

महाराष्ट्रात मराठी बोलण्याचे बंधन आहे असे परिपत्रक 2019 आणि 2020 मध्येही तत्कालिन सरकारने काढले होते. राज्यातील सर्व परिवहन कार्यालयांना आम्ही यासंदर्भात निर्देश दिले आहेत, असे सांगत सरनाईक यांनी मराठी सक्तीवर एकप्रकारे शिक्कामोर्तब केले. 100 दिवसांच्या मोहिमेत सगळे रिक्षा आणि टॅक्सीचालक मराठी बोलतील. या कालावधीत जुजबी मराठीही कुणी शिकू शकले नाही तर मग आपण बघू, असा इशाराही सरनाईक यांनी दिला. कोणी कितीही दबाव टाकला, संपाचे हत्यार उपसले, आंदोलनाच्या धमक्या दिल्या तरी महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर मराठी शिकलेच पाहिजे आणि आम्ही शिकवायला तयार आहोत, शिकून घ्या, असेही सरनाईक यांनी सांगितले. कोणी मराठीत पीएच. डी. करा, एम.ए. करा, असे आम्ही सांगत नाही, पण प्रवाशांशी संवाद साधताना ते काय बोलतात आणि रिक्षा-टॅक्सीचालक काय बोलतात हे एकमेकांना समजलेच पाहिजे, इतकेही मराठी बोलायला येत नसेल त्यांना महाराष्ट्रात व्यवसाय करण्याचा अधिकार नाही, असे ते पुढे म्हणाले.

## सोलापूरकरांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचे रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत जागरण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गुन्ह्यांचे तपासकाम, सण-उत्सव, जयंती मिरवणुकांमधील बंदोबस्ताची ड्यूटी, मंत्री, व्हीआयपी लोकांच्या दौऱ्यांवेळी बंदोबस्त, अशी कामे नेहमीच पोलिसांना करावी लागतात.

दुसरीकडे, जेव्हा आपण आपल्या घरात सुरक्षितपणे झोप घेत असतो, तेव्हा आपल्या सुरक्षेसाठी पोलिस अधिकारी, अंमलदार रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत शहरभर गस्त घालत असतात. सोलापूर शहरातील सात पोलिस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांवर रात्रगस्तीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

सोलापूर शहरात अडीच लाखांवर कुटुंब आहेत, पण शहरात १५ हजार देखील सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. आता उन्हाळ्याचा तडाखा वाढला असून, वीजपुरवठा सारखाच खंडित होत आहे. यामुळे अनेकजण घराच्या छतावर, घराबाहेरील अंगणात झोपतात. त्यावेळी चोरटे डाव साधतात, पण त्यांच्यावर पोलिस लक्ष ठेवून आहेत. त्यासाठी पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त विजय कबाडे, डॉ. अश्विनी पाटील, गौहर हसन यांनी रात्रगस्तीचे वेळापत्रक बनविले आहे. त्याची जबाबदारी पोलिस ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांवर सोपविली आहे.

## राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिक वापरास सक्त मनाई

### ध्वजसंहितेचे पालन करण्याचे आवाहन



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास व निर्मितीस सक्त मनाई आहे. भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापर व निर्मिती करण्यात येऊ नये असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

राष्ट्रध्वजाविषयीचे प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरिता विद्यार्थी नागरिकांकडूनदेखील राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज विविध सार्वजनिक ठिकाणी टाकले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. रस्त्यात इतरत्र विखुरलेले राष्ट्रध्वज बरेच दिवस नष्ट होत नाहीत. राष्ट्रप्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर आहे.. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे.

खराब झालेले, राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करुन नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत. तसेच नागरिकांनी ध्वज संहितेच काटेकोर पालन करावे असे आवाहनही प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.


**सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!**
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949



**आरोग्यविषयक**
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450



शिनगारे सिटी वासुद रोड
अल्टिमेट जिमच्या समोर
सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465



VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरुम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिझेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


**वात्रटिका**

**सक्तची मराठी**

चालवायची असेल तुम्हाला
महाराष्ट्रात टॅक्सी अगर रिक्षा...
आमच्या भाषेत बोला तुम्ही
आणि मराठीची द्या परीक्षा...
धुमधडाक्यात निर्णय घेऊन
केली होती दणक्यात सक्ती...
गळून पडला निर्णय आणि
सक्ती नव्हे जणू ती ठरली युक्ती...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

## संपादकीय

# हवामान संकट आणि विकासाचा भ्रम

आजमितीला संपूर्ण जग निसर्ग व्यवस्थेचा विध्वंस, वाढती आर्थिक विषमता आणि सामाजिक-धार्मिक विसंवाद या त्रिसूत्री संकटाने वेढलेले आहे. २१ व्या शतकात प्रगतीच्या दाव्यांबरोबरच जग अधिक युद्धखोर, हिंस्र, अस्थिर आणि अमानवीय होत चालल्याची खंत सर्वसामान्यांपासून ते विचारवंतांपर्यंत सर्वत्र व्यक्त होत आहे. वैज्ञानिक, साहित्यिक, तत्त्वचिंतक आणि समाजधुरीण यांची चिंता एका मुद्द्यावर एकवटली आहे—पृथ्वी आणि समस्त जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हवामान बदलाचे संकट दिवसेंदिवस तीव्र होत असून मानवजातीसमोरील हे सर्वात मोठे आव्हान बनले आहे.

गेल्या सात-आठ दशकांतील संशोधन स्पष्ट सांगते की मानवनिर्मित तापमानवाढीवर नियंत्रण न आणल्यास पृथ्वीवरील जीवन असुरक्षित होईल. हरितगृह वायूंच्या वाढत्या उत्सर्जनामुळे तापमानात झपाट्याने वाढ होत आहे. विशेषतः जीवाश्म इंधनाच्या अतिवापरामुळे निर्माण झालेली ही परिस्थिती आता नियंत्रणाबाहेर जात आहे. गेल्या ५० वर्षांत मानवाने जितकी नैसर्गिक संसाधने वापरली, ती इतिहासातील एकूण वापरापेक्षा अधिक असल्याची वस्तुस्थिती धक्कादायक आहे. औद्योगिक क्रांतीपूर्व पातळीपेक्षा पृथ्वीचे तापमान सुमारे १.५ अंश सेल्सियसने वाढले असून २०१५ च्या पॅरिस करारातील मर्यादा आजच ओलांडल्या गेल्याचे चित्र आहे.

या संकटाचा विचार केवळ राष्ट्रीय मर्यादांमध्ये करून चालणार नाही. जगातील सुमारे ८०० कोटी लोक जरी वेगवेगळ्या सार्वभौम राष्ट्रांत राहत असले, तरी त्यांचा अधिवास एकच—पृथ्वी. ही एक अखंड जैवव्यवस्था आहे. कोणतेही राष्ट्र पूर्णपणे स्वतंत्र नसून परस्परावलंबी आहे. म्हणूनच पृथ्वी हे सर्वांचे सामाईक घर आहे, ही जाणीव दृढ होणे आवश्यक आहे. निसर्गातील पंचतत्त्वांवर उभ्या असलेल्या जीवनव्यवस्थेत मानवी हस्तक्षेपाने असंतुलन निर्माण केले असून त्यावर नियंत्रण मिळवणे ही संपूर्ण मानवजातीची संयुक्त जबाबदारी आहे.

औद्योगिकीकरणानंतरच्या काळात निरर्थक वाढवृद्धी आणि चंगळवादामुळे संसाधनांची उधळपट्टी झाली. पृथ्वीच्या धारणक्षमतेच्या मर्यादा ओलांडून दरवर्षी पुनर्निर्मितीपेक्षा अधिक वापर होत असल्याने संकट अधिक गडद झाले आहे. तथाकथित विकासाच्या नावाखाली आयात-निर्यातीचे अतिरेकी जाळे निर्माण झाले असून दैनंदिन गरजेच्या वस्तू हजारो किलोमीटरवरून वाहून नेल्या जात आहेत. यामुळे ऊर्जा वापर वाढून हवामान संकट अधिक तीव्र होत आहे. हा विकास नसून विनाशाकडे नेणारा मार्ग आहे. प्रत्यक्षात, बहुतांश गरजा स्थानिक पातळीवर पूर्ण होऊ शकतात. मानवाच्या शेकडो पिढ्यांनी स्थानिक संसाधनांवर आधारित जीवनपद्धती यशस्वीपणे जगली आहे. तथाकथित आधुनिक जीवनशैलीचा पर्यावरणावर होणारा घात याची जाणीव महात्मा गांधींनी पूर्वीच करून दिली होती. त्यांची निसर्गकेंद्री, विकेंद्रित आणि स्वावलंबी अर्थव्यवस्थेची संकल्पना आज अधिकच महत्त्वाची ठरते. स्थानिक उत्पादन, सेंद्रिय शेती आणि मर्यादित गरजांवर आधारित जीवनशैली हीच शाश्वततेची दिशा ठरू शकते.

जागतिक पातळीवरील आर्थिक आणि राजकीय धोरणांनाही याच दिशेने वळवणे आवश्यक आहे. विकेंद्रित अर्थव्यवस्था, स्थानिक संसाधनांचा योग्य वापर आणि समताधिष्ठित विकास यावर भर देणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, नफेखोरी, चंगळवाद आणि निसर्गाचा अतिरेकी वापर यामुळे निर्माण झालेली धनदांडगेशाही समाज आणि पर्यावरण दोन्हीचा ऱ्हास करत राहील.

आज आवश्यक आहे ती सहभागीत्वाची खरी लोकशाही आणि विवेकाधिष्ठित विकासदृष्टी. 'वापरा आणि फेका' ही संस्कृती नाकारून मर्यादित उपभोग, पुनर्वापर आणि संतुलित जीवनशैली स्वीकारावी लागेल. विकासाच्या नावाखाली चाललेली अनियंत्रित वाढ ही प्रगती नसून विनाश आहे, हे स्पष्टपणे मान्य करण्याची वेळ आली आहे.

सारांशतः, अतिरिक्त उत्पादन आणि विस्ताराऐवजी उपलब्ध संसाधनांचा सुयोग्य वापर, फेरवाटप आणि शास्त्रीय नियोजन यावर भर दिला पाहिजे. पृथ्वीवरील संसाधने ही कोणत्याही एका राष्ट्राची मक्तेदारी नसून संपूर्ण मानवजातीचा सामूहिक वारसा आहेत. त्यांचा वापर सर्वांच्या हितासाठी, शाश्वततेच्या तत्त्वांवर आधारित असावा. अन्यथा, मानवाने निर्माण केलेल्या संकटातून सुटका अशक्य ठरेल.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आणि कार्य

दि. ३० एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक तेजस्वी स्मरणदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने पाळली जाते. हा दिवस केवळ एका संताच्या जन्माचा उत्सव नसून, तो समाजजागृतीच्या, ग्रामविकासाच्या आणि मानवतेच्या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. तुकडोजी महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याद्वारे भारतीय समाजाला केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला नाही, तर सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय बांधणी आणि ग्रामविकासाची एक सशक्त संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या कार्यात अध्यात्म आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम दिसून येतो. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या लहानशा गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. परंतु या परिस्थितीने त्यांना खचवले नाही, उलट त्यांच्यातील संवेदनशीलता, करुणा आणि समाजाविषयीची बांधिलकी अधिकच दृढ झाली. लहान वयातच त्यांना आध्यात्मिक ओढ निर्माण झाली आणि संतपरंपरेतील मूल्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला. त्यांच्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आध्यात्मिक साधना केली आणि त्यातूनच त्यांच्या जीवनाला एक स्पष्ट दिशा मिळाली.



तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी होते. ते केवळ संत नव्हते, तर ते एक उत्कृष्ट वक्ते, कवी, कीर्तनकार, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने आणि सुलभ भाषेतून सामान्य जनतेपर्यंत आपले विचार पोहोचवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये केवळ धार्मिक विषय नव्हते, तर सामाजिक समस्यांवर भाष्य करणारा आशय होता. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, अशिक्षण, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर कठोर शब्दांत टीका केली आणि समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तनाला केवळ धार्मिक विधी म्हणून न पाहता, ते समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये लोकभाषेचा वापर असल्यामुळे ते सर्वसामान्य लोकांना सहज समजत. त्यांनी लोकांच्या मनातील अज्ञान, भीती आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सोप्या आणि प्रभावी पद्धतीचा अवलंब केला. त्यांच्या कीर्तनांमुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या कायातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे ह्यग्रामगीताह्व हा ग्रंथ. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडणारा एक व्यापक आणि सखोल ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे. गावातील स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्ये यांचा सखोल विचार त्यांनी ग्रामगीतेमध्ये मांडला आहे. त्यांच्या मते, गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास. त्यामुळे प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंस्कृत असणे आवश्यक आहे.

ग्रामगीतेतील विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजही ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. अस्वच्छता, अशिक्षण, बेरोजगारी, सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून तुकडोजी महाराजांनी दिलेले विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी ग्रामविकासाला एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना आपल्या गावाच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना लोकांच्या मनात निर्माण केली. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना प्रेरित केले आणि राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्यांच्या कायार्मुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. परंतु त्यांनी कधीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना अत्यंत प्रखर होती.

स्वातंत्र्यानंतरही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. त्यांनी लोकांना स्वावलंबन, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना संघटित करून विकासाच्या कार्यात सहभागी केले. स्वच्छतेबाबत त्यांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' ही संकल्पना रुजवली. त्यांनी स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या या कृतीतून त्यांनी समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. बदल घडवायचा असेल तर स्वतःपासून सुरुवात करावी लागते. त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि स्वच्छतेला सामाजिक जबाबदारीचे रूप दिले.

तुकडोजी महाराजांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे समाजाच्या विकासाचे मुख्य साधन आहे. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी लोकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी नैतिक शिक्षणावर भर दिला आणि समाजात मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट आग्रह दिसून येतो. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी समाजातील स्त्रियांना समान स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांविषयी सकारात्मक बदल घडून आले.

तुकडोजी महाराजांचे विचार हे अत्यंत व्यापक आणि सर्वसमावेशक होते. त्यांनी धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार मांडला. त्यांच्या मते, सर्व धर्मांचा मूलभूत संदेश एकच आहे तो म्हणजे मानवतेची सेवा होय. त्यांनी समाजात बंधुभाव आणि ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळात तुकडोजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. वाढती भौतिकता, सामाजिक असमानता, पर्यावरणीय समस्या आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच उपयुक्त आहे.

तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी ग्रामविकासाला केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीच्या चौकटीत न ठेवता त्याला एक सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित स्वरूप दिले. त्यांच्या दृष्टीने ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी किंवा शेतीपुरते मर्यादित नव्हते, तर तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा होता. त्यांनी ग्रामजीवनातील नैतिकता, परस्पर सहकार्य, सामूहिक जबाबदारी आणि आत्मसन्मान यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, जर गावातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करेल, तर गाव आपोआप प्रगत होईल. ही विचारधारा आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

तुकडोजी महाराजांनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला एक वेगळा अर्थ दिला. त्यांनी ग्रामस्वराज्याला केवळ राजकीय स्वायत्तता म्हणून न पाहता, ते सामाजिक आणि आर्थिक स्वावलंबनाचे प्रतीक मानले. त्यांनी गावांनी बाह्य अवलंबित्व कमी करून स्वतःच्या संसाधनांचा योग्य वापर करावा, स्थानिक कौशल्यांचा विकास करावा आणि स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करावी, असे प्रतिपादन केले. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांचे हे विचार अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या कार्यात युवकांच्या भूमिकेला विशेष स्थान होते. त्यांनी युवकांना समाजपरिवर्तनाचे मुख्य घटक मानले. त्यांनी युवकांना केवळ शिक्षण घेण्यापुरते मर्यादित न राहता, समाजसेवा, राष्ट्रसेवा आणि नैतिक मूल्यांच्या जपणुकीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या कीर्तनांमध्ये आणि प्रवचनांमध्ये युवकांना प्रेरणा देणारे संदेश असत. त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवन, शिस्तबद्ध वर्तन आणि समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा दिली.

तुकडोजी महाराजांनी पर्यावरण संरक्षणालाही अप्रत्यक्षपणे महत्त्व दिले. त्यांनी स्वच्छतेवर, निसर्गाशी सुसंवाद ठेवण्यावर आणि साधेपणाने जीवन जगण्यावर भर दिला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आग्रह दिसून येतो. आजच्या काळात वाढत्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. त्यांच्या कायार्चा प्रभाव केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यांनी संपूर्ण समाजावर एक सकारात्मक परिणाम घडवून आणला. त्यांनी लोकांना एकत्र आणले, सामाजिक ऐक्य निर्माण केले आणि समाजात बंधुभावाची भावना रुजवली. त्यांच्या कायार्मुळे अनेक लोकांनी आपले जीवन बदलले आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा घेतली.

भारत सरकारने त्यांच्या कायार्ची दखल घेऊन त्यांना ह्यराष्ट्रसंतह्व ही उपाधी बहाल केली. ही उपाधी त्यांच्या कायार्चा गौरव करणारी आहे. परंतु त्यांच्या खऱ्या महानतेचे मोजमाप त्यांच्या कायार्तून समाजात घडलेल्या परिवर्तनातूनच करता येते. त्यांनी कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता, निस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य केले. त्यांच्या जीवनात साधेपणा आणि प्रामाणिकता यांचे अद्वितीय उदाहरण दिसून येते. आजच्या काळात समाज अनेक समस्यांना सामोरे जात आहे. सामाजिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, नैतिक मूल्यांचा ऱ्हास. या सर्व समस्यांवर उपाय शोधताना तुकडोजी महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा, स्वावलंबनाचा, स्वच्छतेचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. तुकडोजी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करताना असे जाणवते की, त्यांनी समाजाला दिलेले संदेश हे केवळ त्या काळापुरते मर्यादित नसून ते सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहेत. त्यांनी दिलेला मानवतेचा संदेश, समतेचा विचार आणि राष्ट्रप्रेमाची भावना आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकते. त्यांच्या कार्यातून आपण शिकू शकतो की, समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर केवळ विचार पुरेसे नसतात, तर त्यासाठी कृती आवश्यक असते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करून समाजासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामविकासासाठी, स्वच्छतेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. आजच्या तरुण पिढीसमोर अनेक संधी आणि आव्हाने आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन अधिक सोपे झाले असले तरी नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. अशा परिस्थितीत तुकडोजी महाराजांचे विचार तरुणांना योग्य दिशा देऊ शकतात. त्यांनी दिलेला साधेपणाचा, प्रामाणिकतेचा आणि सेवाभावाचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.

शेवटी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन आणि कार्य हे आपल्या समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करूया, त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करूया आणि त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या कायार्चा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यांच्या ग्रामगीतेतील विचारांना आपल्या जीवनात स्थान देऊन आपण एक सशक्त, समृद्ध आणि नैतिक मूल्यांनी परिपूर्ण समाज निर्माण करू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून, ते वर्तमान आणि भविष्याच्या दिशादर्शनासाठी एक प्रकाशस्तंभ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा दृढ संकल्प करूया, हीच खरी कृतज्ञता ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# जिल्हा युवा पुरस्कारसाठी 5 जून पर्यंत अर्ज करण्याबाबत पुनश्च आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्र व राज्याच्या उभारणीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून समाजातील विविध क्षेत्रात अनेक युवक व युवा संस्था उल्लेखनीय कार्य करीत आहेत. युवकांमधील सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्या कार्याचा गौरव करणे व त्यांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने राज्य शासनाच्या युवा धोरणांतर्गत शासन निर्णय दि. १२ जानेवारी २०१३ नुसार राज्य व जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

सन २०२५-२६ या वषार्साठी सोलापूर जिल्ह्यातील समाजोपयोगी कार्य करणाऱ्या युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र प्राप्त अर्जांची संख्या अपेक्षेपेक्षा कमी असल्यामुळे अधिक स्पर्धात्मक व गुणवत्तापूर्ण निवड प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी पुनश्च अर्ज मागविण्यात येत आहेत.

जिल्हास्तरावर १ युवक, १ युवती व १ नोंदणीकृत संस्थेला जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप व्यक्तींसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रुपये १० हजार रोख, तर संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रुपये ५० हजार रोख असे आहे.

सदर पुरस्कारासाठी ग्रामीण व शहरी भागात केलेले सामाजिक कार्य, दुर्बल घटकांसाठी योगदान, अनुसूचित जाती-जमाती व आदिवासी विकास, शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, क्रीडा, सांस्कृतिक व विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्र, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, राष्ट्रीय एकात्मता, नागरी वस्ती सुधारणा, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्यांवरील कायार्चा विचार करण्यात येणार आहे. अर्जदारांच्या दि. ०१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत मागील तीन वर्षांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात येईल.

पूर्वी अर्ज न केलेल्या पात्र युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांनी प्राधान्याने अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुकांनी परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दि. ०५ जून २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त पात्र युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# खरीपसाठी पीक प्रात्यक्षिके व प्रमाणित बियाणे वितरणासाठी शेतकरी गटांना अर्जाचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अन्नधान्य पिके, कडधान्य आत्मनिर्भरता अभियान तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ साठी शेतकरी गटांकडून पीक प्रात्यक्षिके व प्रमाणित बियाणे वितरण या घटकांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

या अभियानांतर्गत तुर, मुग, उडीद, बाजरी, मका व सोयाबीन या पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पीक प्रात्यक्षिके आयोजित करण्यात येणार असून प्रमाणित बियाण्यांचे वितरणही करण्यात येणार आहे.

पीक प्रात्यक्षिकांसाठी अर्ज करताना दि. ३१ मार्च २०२४ पूर्वी कोणत्याही शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत असलेले शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था पात्र राहणार आहेत. संबंधित गटाने अधिकृत केलेल्या सदस्यामार्फत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करता येणार आहे. गटांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' (FCFS) या तत्वावर करण्यात येईल.

अर्ज करण्यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin/ Agrillogin या संकेतस्थळावरील 'प्रात्यक्षिक, औषधे आणि खते' या पयार्याखाली शेतकरी गटांना अर्ज सादर करता येतील. तसेच बियाणे वितरण घटकासाठी वैयक्तिक लाभार्थ्यांनाही अर्ज करता येणार आहेत.

शासनाच्या नियमानुसार अर्जदार व लाभार्थी गटातील सदस्यांकडे Farmer ID असणे बंधनकारक आहे. अधिकाधिक शेतकरी गटांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचा 67 वा स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ शुक्रवार दिनांक 01 मे 2026 रोजी सकाळी 08.00 वाजता तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे होणार आहे. आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न होणार असून, या समारंभास मान्यवर नागरिक, स्वातंत्र्य सैनिक तसेच शासकीय-निमशासकीय अधिकारी कर्मचारी यांनी राष्ट्रीय पोषाखात उपस्थित रहावे असे, आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे व तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी प्रांगणात जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या 67 व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते शुक्रवार, दिनांक 1 मे 2026 रोजी सकाळी 7.10 वाजता ध्वजारोहण होणार आहे. तरी जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विहित वेळेच्या पंधरा मिनिटे अगोदर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रीय पोशाखात उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले आहे.

# मोहोळ तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांना वाळू वितरणाला सुरुवात; पाठपुराव्याला यश

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना शासकीय नियमानुसार पाच ब्रास वाळू मिळावी या मागणीस अखेर यश आले असून प्रशासनाने वाळू वितरणाची प्रक्रिया सुरू केली आहे. पंचायत समिती सदस्य तथा गटनेते संजीव खिलारे यांनी सातत्याने पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावला.

महसूल प्रशासनाकडून होत असलेल्या टाळाटाळीविरोधात खिलारे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. तसेच, 'घरकुलांना वाळू द्या, अन्यथा न्याय्य हक्कांसाठी २८ एप्रिल रोजी मुख्यमंत्र्यांना 'प्रतिकात्मक उघडे' होऊन निवेदन देऊ,' असा इशाराही देण्यात आला होता. या इशाऱ्यानंतर प्रशासनात खळबळ उडाली होती.

मुख्यमंत्री कार्यालयाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेत सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले व तातडीने कार्यवाहीची मागणी केली.

पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी सोलापूर व उपविभागीय अधिकारी पंढरपूर यांना त्वरित सूचना दिल्यानंतर प्रशासनाने हालचाल करत मोहोळ तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू केली. सोमवार, दि. २७ एप्रिलपासून देगाव येथील भोगावती नदी पात्रातून वाळू वितरणास सुरुवात झाली आहे.

या निर्णयामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटण्याच्या मार्गावर असून घरकुल लाभार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सायबर भामट्यांवर मोठी कारवाई
## ९,४०० व्हॉट्सअॅप खाती बंद

**नवी दिल्ली (कटूसत्य वृत्त):-** ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर व्हॉट्सअॅपने मोठी कारवाई करत अटक फसवणुकीशी संबंधित तब्बल ९,४०० खाती बंद केली आहेत. ही कारवाई जानेवारी २०२६ पासून करण्यात आल्याची माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिली. डिजिटल अटक आणि सायबर फसवणूक रोखण्यासाठी दूरसंचार विभाग, सेवा प्रदाते, भारतीय रिझर्व्ह बँक, तंत्रज्ञान कंपन्या आणि केंद्रीय अन्वेषण विभाग यांच्याकडून समन्वयाने बहुआयामी कारवाई सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ९ फेब्रुवारीच्या निर्देशांनुसार गृह मंत्रालयाच्या भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने सविस्तर स्थिती अहवाल सादर केला आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने डिजिटल अटक प्रकरणांची स्वतःहून दखल घेत कडक निर्देश जारी केले होते. त्यानुसार संशयास्पद ऑनलाइन हालचालींवर नियंत्रणासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

व्हॉट्सअॅपकडून नवीन सुरक्षा सुविधा आणण्याचा विचार सुरू असून, 'नवीन' किंवा 'संशयास्पद' खात्यांवरून कॉल आल्यास वापरकर्त्यांना इशारा देण्यात येणार आहे. तसेच भामट्यांना पोलीस किंवा सरकारी यंत्रणांची चिन्हे वापरता येऊ नयेत, यासाठी अज्ञात कॉलर्सचे प्रोफाइल छायाचित्र लपविण्याची स्वयंचलित प्रणाली विकसित केली जात आहे.

याशिवाय 'चिन्ह ओळख तंत्रज्ञान' (लोगो डिटेक्शन) द्वारे अधिकृत पोलीस किंवा सरकारी चिन्हे वापरणारी बनावट खाती ओळखून तत्काळ हटवली जाणार आहेत.

दरम्यान, दूरसंचार विभाग आणि दूरध्वनी कंपन्यांकडून बनावट सिमकार्डवरही कडक कारवाई सुरू असून, खात्री झाल्यानंतर २ ते ३ तासांत अशी सिमकार्डे बंद करण्याची यंत्रणा तयार करण्यात येत आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# लक्ष्मी-नृसिंह देवस्थान ट्रस्टतर्फे भव्य मोफत आरोग्य शिबिर संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** नीरा नरसिंहपूर (ता. इंदापूर) येथील नृसिंह जयंती नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून श्री लक्ष्मी-नृसिंह देवस्थान ट्रस्ट व जे.एफ.अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त ज्ञानेश्वर अरगडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी धाराशीव रोटरी सेवा ट्रस्टचे सचिव प्रविणराव काळे,विश्वस्त अभयकुमार वांकर,प्रमोद दंडवते उपस्थिती होते.

एक सामाजिक बांधीलकी जपण्याच्या उद्देशाने या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात एकूण शंभरहून आधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली.या शिबीरात प्रामुख्याने नेत्र तपासणी आणि दंतचिकित्सा तपासणी करण्यात आली.या तपासणी शिबिरात बारा रूग्णांना मोतीबिंदू झालेल्या रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान झाले आहे.नेत्र तपासणीनंतर ३६ रूग्णांना मोफत चष्माचे वाटप करण्यात आले.12 मोतीबिंदू बाधित रुग्ण आढळून आले असून त्यांना पुढील शस्त्रक्रियेसाठी तारीख देण्यात आली आहे.या रुग्णांवर लवकरच मोतीबिंदूची शस्त्रक्रिया लक्ष्मी-नृसिंह देवस्थान ट्रस्टच्या वतीने पूर्णपणे मोफत केल्या जाणार आहेत. जनसेवा हिच ईश्वर सेवा समजून या आरोग्य शिबीराची सेवेची दहा वर्षांची परंपरा ट्रस्टने अविरतपणे सुरू ठेवली आहे. दरवर्षी नवरात्र उत्सवात अशा प्रकारच्या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करून गरजू रुग्णांना मदतीचा हात दिला जातो.या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, शिबिराच्या यशस्वीतेसाठी ट्रस्टच्या सर्व सदस्यांनी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी सेवा ट्रस्टचे माजी सचिव प्रमोद दंडवते,डॉ. शिवानी मेनकुदळे,शिवरुद्र इसाके, सौरभ बनसोडे,नंदकुमार पाटील तसेच रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचे ईच्छा भगवंताची परिवाराला मोबाईलद्वारे शुभाशीर्वाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब मंगळवारी सोलापुरात भारतीय जनता पार्टीच्या विजयी मेळावा व कृतज्ञता सोहळ्यासाठी हरिभाई देवकरण प्रशाला येथे आले होते. या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २२ चे भाजपा नगरसेवक किसन जाधव यांनी आपल्या परिवारातील विवाह सोहळ्यास उपस्थित राहण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना केली होती ईच्छा भगवंताची परिवाराचे आधारस्तंभ लक्ष्मण (मामा) जाधव यांचा नातू ॲड. अनिल लक्ष्मण जाधव यांचे ज्येष्ठ सुपुत्र अजिंक्य आणि तनिषा यांच्या विवाह सोहळ्यानिमित्त ही विनंती करण्यात आली होती. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या अत्यंत व्यस्त दौऱ्यामुळे त्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही. तरीही माजी आमदार राम सातपुते यांच्या मोबाईलद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी किसन जाधव यांच्याशी संवाद साधत नवदांपत्यास मनःपूर्वक शुभाशीर्वाद दिले. तसेच लवकरच सोलापूर दौऱ्यादरम्यान जाधव परिवाराची भेट घेण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. या प्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी व आमदार देवेंद्र कोठे यांनीही मुख्यमंत्र्यांकडे विनंती केली होती. मुख्यमंत्री स्वतः उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांच्या मोबाईलद्वारे दिलेल्या शुभेच्छांमुळे जाधव कुटुंबीयांमध्ये मुख्यमंत्र्याच्या या साधेपणाने व कार्यकर्त्यांप्रती असलेल्या जिव्हाळ्यामुळे जाधव कुटुंबियांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वसामान्य कार्यकर्त्यांची जाण असलेला नेता अशी भावना किसन जाधव यांनी व्यक्त केली.

# उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या ३४ कर्मचाऱ्यांना दंड; महापालिकेची कारवाई



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महापालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी सुरू असलेल्या नवीन मिळकती शोध मोहिमेत उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या ३४ कर्मचाऱ्यांवर महापालिका प्रशासनाने कारवाई केली आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना एकूण ३५ हजार रुपयांचा आर्थिक दंड ठोठावण्यात आला आहे. ही कारवाई महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केली.

महापालिका मालमत्ता कर विभागातील कर्मचाऱ्यांना ८ एप्रिलच्या आदेशानुसार नवीन मिळकतींचा शोध घेणे, तसेच अपार्टमेंटमधील शिल्लक फ्लॅट व गाळ्यांची दररोज किमान पाच मिळकतींची आकारणी करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. एप्रिल महिन्यात या मोहिमेअंतर्गत मोठ्या प्रमाणात नवीन मिळकतींचा शोध घेऊन कर आकारणी अपेक्षित होती.

मात्र २७ एप्रिलपर्यंतच्या एकत्रित अहवालानुसार अनेक कर्मचाऱ्यांनी दिलेल्या उद्दिष्टानुसार सर्वेक्षण व आकारणीची कार्यवाही केलेली नसल्याचे आढळून आले. वारंवार सूचना व निर्देश देऊनही कामात सुधारणा न झाल्याने प्रशासनाने ही बाब गंभीर मानली.

या निष्काळजीपणाबद्दल ४ कर निरीक्षक आणि ३० वसुली लिपिक अशा एकूण ३४ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तरीही समाधानकारक प्रगती न झाल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५६ (२) (ड) नुसार संबंधितांवर आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली.

दरम्यान, हा दंड एप्रिल महिन्याच्या (मे महिन्यात देय) वेतनातून वसूल केला जाणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.

# दौंड-कलबुर्गी शटलला कायमस्वरूपी मान्यता

## प्रवासी सेवा संघाचा पाठपुरावा यशस्वी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रवासी सेवा संघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून, दौंडझकलबुर्गीझदौंड या विशेष शटल रेल्वे सेवेला कायमस्वरूपी मान्यता मिळाली आहे. रेल्वे बोर्ड, रेल्वे मंत्रालय (नवी दिल्ली) यांच्याकडून या गाडीला नियमित सेवेसाठी मंजुरी देण्यात आली आहे.

दि. १ एप्रिल २०२५ पासून ही गाडी विशेष सेवा म्हणून सुरू होती. प्रवाशांच्या वाढत्या प्रतिसादामुळे आणि या मार्गावरील गरज लक्षात घेऊन प्रवासी सेवा संघाने वेळोवेळी मुदतवाढीसाठी पाठपुरावा केला. या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे 01421 / 01422 आणि 01425 / 01426 या क्रमांकाच्या गाड्यांना आता कायमस्वरूपी स्वरूप प्राप्त झाले आहे.

या निर्णयामुळे दौंड, सोलापूर, कलबुर्गी या मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, प्रवास अधिक सोयीस्कर आणि नियमित होणार आहे.

प्रवासी सेवा संघ सोलापूरच्या वतीने सर्व सहकार्य करणाऱ्या नागरिक, पदाधिकारी आणि रेल्वे प्रशासनाचे आभार मानण्यात आले आहेत. संघटनेने ही यशस्वी लढत सर्वांच्या एकजुटीचा परिणाम असल्याचे सांगितले आहे.

'सर्वांच्या प्रबळ इच्छाशक्ती आणि सहकार्यामुळे ही सेवा कायमस्वरूपी झाली,' अशी भावना संघटनेने व्यक्त केली.

# 'आपली बस, आपली सेवा' अभियानातून एसटी प्रवाशांना सन्मानाची वागणूक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रवाशांना अधिक दर्जेदार आणि सन्मानपूर्वक सेवा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'आपली बस, आपली सेवा' हे विशेष अभियान राज्यभर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, १ मे २०२६ पासून त्याची अंमलबजावणी होणार आहे. सोलापूर विभागासह सर्व आगारांना यासंदर्भातील आदेश देण्यात आले आहेत.

खासगी वाहतुकीच्या वाढत्या स्पर्धेमुळे एसटीच्या प्रवासी संख्येत घट होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रवाशांशी सौजन्याने वागणे, त्यांचा प्रवास अधिक सुखकर व सुरक्षित करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

अभियानाअंतर्गत चालक, वाहक व कर्मचाऱ्यांना स्वच्छ गणवेश व नेम प्लेट परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे. बस सुटण्यापूर्वी वाहकाने प्रवाशांचे अभिवादन करून स्वतःची व चालकाची ओळख करून देणे, तसेच प्रवासाचा मार्ग, थांबे आणि अंदाजे वेळ याची माहिती देणे आवश्यक राहणार आहे.

आरक्षित प्रवासी वेळेत बसमध्ये न पोहोचल्यास त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. प्रवाशांच्या सामानाची सुरक्षितता राखण्यासाठी सहकार्य करणे, मोठ्या बॅगा व्यवस्थित ठेवण्यास मदत करणे यावरही भर दिला जाणार आहे.

डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी 'एनसीएमसी' कार्डचा वापर आणि MSRTC Bus Reservation ॲपद्वारे आगाऊ आरक्षण करण्यास प्रवाशांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. तसेच तक्रार निवारणासाठी विभाग स्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असून, तक्रारींचा नियमित आढावा घेतला जाईल.

दरम्यान, बसमध्ये बिघाड झाल्यास प्रवाशांसाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करण्याच्या सूचनाही आगार प्रमुखांना देण्यात आल्या आहेत.


**महाराष्ट्र शासन**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर.**

**निविदा सुचना सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सोलापूर हे मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२५-२६ मधुन मौजे जामगांव बु. तालुका मोहोळ गावामध्ये दशरत गायकवाड वस्ती मध्ये ग्रामपंचायत जागेत बोर, सबमर्सिबल पंप, टाकी बसविणे हे काम करणे आहे. अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणारे ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदा विक्री दिनांक:- ३०/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजले पासून दिनांक :- ०८/०५/२०२६ रोजी दुपारी १८.०० वाजे पर्यंत यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सोलापूर येथे (शासकीय सुट्टी दिवस वगळुन) उपलब्ध राहील.

निविदेचा तांत्रिक लिफाफा दिनांक शक्यतो :- ११/०५/२०२६ रोजी उघडण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | निविदा शुल्क | काम पुर्ण करणेची मुदत | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे जामगांव बु. तालुका मोहोळ, येथील दशरत गायकवाड वस्ती येथे ग्रामपंचायत जागेत बोर, सबमर्सिबल पंप, टाकी बसविणे. | २,९९,९३६/- | ३,०००/- | १००/- | ९० दिवस | अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणारे ठेकेदार |

१. उपरोक्त सर्व कामाबाबत निविदा, अटी व शर्ती इत्यादी बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमुद केलेला असून कोऱ्या निविदा संच उप अभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद सोलापूर येथे मिळतील.
२. उपरोक्त तक्त्यातील कामाचे नावासमोर रकाना क्रं. ०४ मध्ये नमुद केलेल्या बयाणा रक्कम धनाकृर्ष मुख्य लेखा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर च्या नांवे तयार करुन सदर निविदेतील तांत्रिक लिफाफा कागदपत्रासोबत देणे.
३. निविदेच्या अटी शर्ती बदल करणे, प्राप्त निविदापैकी, एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला आहे.

**-स्वाक्षरीत-**
**उपअभियंता(यांत्रिकी)**
**यांत्रिकी उपविभाग,**
**जिल्हापरिषद,सोलापुर**

**-स्वाक्षरीत-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद, सोलापुर**



जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/ मोप्र-१ दिनांक : १८/१०/ २०२३

**परिशिष्ट-३**

(ई - निविदेसाठी जाहिरात नमुना)

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र.२ पुणे ३७ यांचे कार्यालय,**

पत्ता : नविन मुठा कालव्याशेजारी, स्वारगेट, पुणे - ४११०३७.
ई मेल:- eemd123@gmail.com, दूरध्वनी क्रमांक. ०२०-२४२६६०११

**ई निविदा सुचना क्र.२०-१/२/३ (व्दितीय मागणी सन २०२५-२०२६)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ हे सक्षम शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदा किंमत (वस्तु व सेवाकर वगळुन) |
|---|---|---|---|
| १ | उजनी डावा कालवा सा. क्र. ८६/७२० येथील काटनियामक व्दारे (५.५X३.५-३ नग) यांची दुरुस्ती, केबीन बनविणे, उच्चालक दुरुस्ती व वायर रोप बदलणे इ. कामे करणेबाबत. | सोलापूर | रु.२७,९२,३९५/- |
| २ | उजनी डावा कालवा सा. क्र. १९/७६० मधील काटनियामक दुरुस्ती करणे. | सोलापूर | रु.२३,८९,५८६ /- |
| ३ | भीमा पाटबंधारे उपविभाग, करकंब अंतर्गत उजनी डावा कालवा वरील असणारे वितरिका क्र. ३३ व ३४,CR,लोखंडी पुल व्दार दुरुस्ती करणे. | सोलापूर | रु.२७,६१,१४१/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी: दि:३०/०४/२०२६ वेळ:११.०० ते दि:०८/०५/२०२६ वेळ:१८.००
ई-निविदा उघडण्याचा दिनांक : दिनांक - ११/०५/२०२६ वेळ : १२.०० (शक्य झाल्यास)
महाराष्ट्र शासन,जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण / १२१७ /प्र.क्र. ११४/१७ ) / यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण ०५२३/(प्र.क्र.२५/२०२३) /यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७/प्र.क्र.२४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील. खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

जा. क्र. १०५०, दिनांक : १७/४/२०२६
कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र.२ पुणे ३७

जिमाका/सो/जाहि/२२/२०२६-२७

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**यांत्रिकी विभाग क्र. २, पुणे ३७**



## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आईची बहीण २) अंतराळ कक्षेतील वाहन ३) पाच गुणिले सहा ४) राष्ट्रवादीचे संस्थापक ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढतात ती तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) बंडखोर स्वभावाचे नेते-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन लढाईची पध्दत-गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यापासून बनवितात ते पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्याला वश करण्याचे उपाय-** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा वार २२) फलंदाजाने बनविलेल्या शंभर धावा २३) वस्तूंची संख्या २५) ध्यास, घेतला ** टाकू नये २६) वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक-** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) हस्त, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती ३७) मुरली, बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

**आडवे शब्द :** १) युपीच्या माजी महिला मुख्यमंत्री, बसपा सुप्रिमो
४) ऐंशीच्या दशकातील एक अभिनेता -*** सिन्हा
५) मुलाचे एक नाव ७) एक (इंग्रजीत)
८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास
१३) काकाची पत्नी १४) शनिवारवाडा या शहरात आहे
१५) उडिदाच्या पिठापासून लाटून बनवितात ते
१६) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस १७) धातूचा बारीक तंतू
१८) गोंधळ, गोंगाट १९) मनाने मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत)
२४) चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अंतराळवीर-** आर्मस्ट्राँग
२५) उन्हाळ्यात वादळी वाऱ्यासह पडणारा पाऊस
२७) बजरंगबलीच्या हातातील आयुध २८) याच्यापासून शिरा बनवितात
२९) परीट, धोबी ३१) एक थोर जैन संत ३३) गुलाम, सेवक
३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक
३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात ३८) सागर, दर्या
४०) एक द्विदल कडधान्य
४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

## सुडोकु - 238

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | | | 4 | | | 6 | |
| | | 1 | 6 | | | 8 | 9 | |
| | | 9 | 8 | 3 | 1 | 5 | | 7 |
| 4 | 9 | | 1 | 5 | 7 | | | |
| | | | | | | | | |
| | 5 | 3 | | | 4 | | | |
| 9 | 6 | | 4 | 1 | 5 | | | 8 |
| 1 | | | 7 | 6 | 3 | 2 | | |
| 3 | | | | 2 | 8 | | 5 | 1 |

# अपघातादिवशी सिंग यांच्या खात्यात कोट्यवधींची रक्कम ?




**पुणे (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यू प्रकरणात नवीन वाद निर्माण झाला असून, अपघाताच्या दिवशी आणि त्यानंतर मोठ्या आर्थिक व्यवहारांचे आरोप पुढे आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी या संदर्भात गंभीर आरोप करत सखोल चौकशीची मागणी केली आहे.

रोहित पवार यांच्या म्हणण्यानुसार, अपघाताच्या दिवशी विमान कंपनीशी संबंधित पालक व्ही. के. सिंग यांच्या खात्यात तब्बल ९ कोटी ८१ रुपये हस्तांतरित करण्यात आले. तसेच, अंत्यविधीच्या दिवशी त्यांच्या खात्यात आणखी १६ कोटी ८८ लाख रुपये जमा झाल्याचा आरोप त्यांनी केला. आतापर्यंत संबंधित विमान कंपनीच्या खात्यात एकूण ४५ कोटी रुपयांची रक्कम जमा झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

तीन महिन्यांपूर्वी घडलेल्या या अपघाताच्या तपासाबाबत सरकार आणि तपास यंत्रणा गांभीयार्ने काम करत नसल्याची नाराजी रोहित पवार यांनी व्यक्त केली. तपासाचा आढावा घेण्यासाठी ते सीआयडी कार्यालयात गेले असता, वरिष्ठ अधिकारी अनुपस्थित असल्याचे आढळले. सलग तिसऱ्यांदा भेट देऊनही जबाबदार अधिकारी न भेटल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

'अजित पवार विमान अपघात प्रकरणाकडे सरकार आणि तपास यंत्रणा गंभीरतेने पाहत नाहीत. पुढील वेळी मला सीआयडी कार्यालयाबाहेरील पोलीस कर्मचाऱ्यांशीच संवाद साधावा लागेल,' अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

याचबरोबर, अपघातापूर्वी काटेवाडीतील निवासस्थान आणि मुंबईतील देवगिरी बंगल्याच्या परिसरात अघोरी पूजा झाल्याचा आरोपही रोहित पवार यांनी केला. ह्लआम्ही काळी जादू किंवा भोंदूगिरीवर विश्वास ठेवत नाही, मात्र या घटनांमागील उद्देश काय आहे, याचा शोध घेणे आवश्यक आहे. हा प्रकार एखाद्या राजकीय षड्यंत्राचा भाग असू शकतो,'असा गंभीर आरोप त्यांनी केला.

अघोरी पूजा प्रकरणासह अशोक खरात प्रकरणाचीही सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.दरम्यान, या सर्व आरोपांमुळे अजित पवार विमान अपघात प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले असून, तपास यंत्रणांवर दबाव वाढण्याची शक्यता आहे.

# बदलत्या काळात नाती संवेदनशील : साहित्यिक श्रीकांत मोरे

## साहित्य, उद्योगी सेवाकर्मींचा प्रेरणादायी सन्मान



**पणजी (कटूसत्य वृत्त):-** बदलत्या काळात नाती अधिक संवेदनशील झाली असून त्यांना जपण्यासाठी संवाद आणि संयम या दोन गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, सहकार महर्षी श्रीकांत मोरे यांनी केले.

मनोरमा साहित्य मंडळ, सोलापूर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीकांत मोरे - सौ. शोभा मोरे तसेच वरिष्ठ सेवानिवृत्त अधिकारी संभाजीराव काकडे - संजीवनी काकडे यांच्या सहजीवनाच्या ४० वर्षांच्या प्रवासानिमित्त आयोजित 'सहजीवन सोहळा' गोव्यातील मेरियॉट रिसॉर्ट येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्याने सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचा अनोखा ठसा उमटवला.

कार्यक्रमात साहित्य, कला आणि समाजकार्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दाम्पत्यांचा गौरव करण्यात आला. गोव्यातील पाच कलाप्रेमी व सेवाभावी दाम्पत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान होताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. सन्मानित दाम्पत्यांमध्ये राजेंद्र केरकर - पौर्णिमा केरकर, डॉ. दत्ताराम देसाई - ऊर्मिला देसाई, राजेंद्र देसाई - आरती देसाई, जयंत मिरिंगकर - दीपा मिरिंगकर, प्रकाश क्षीरसागर - चित्रा क्षीरसागर यांचा समावेश होता.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रा. अनिल सामंत यांनी भूषवले. त्यांनी आपल्या भाषणातून सध्याच्या सामाजिक बदलांचा वेध घेतला. प्रमुख अतिथी म्हणून श्रीकांत मोरे, सौ. शोभा मोरे, संभाजीराव काकडे, संजीवनी काकडे, 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक व आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे तसेच लेखिका डॉ. अनुजा जोशी उपस्थित होत्या.

याच निमित्ताने आयोजित 'रंग सहजीवनाचे' या विशेष कवीसंमेलनाने कार्यक्रमाला वेगळेच भावविश्व दिले. दया मित्रगोत्री, कविता बोरकर, अंजली चितळे, चंद्रशेखर गावस, डॉ. विनय बापट, मेघना कुरूंदवाडकर, डॉ. नीता तोरणे, लक्ष्मण पित्रे, सोनाली धीरज परब, पूर्णिमा देसाई, सचिन मणेरीकर, अपूर्वा ग्रामोपाध्ये, कालिका बापट, प्रमोद कारापूरकर, विश्वनाथ जोशी, गौरी कुलकर्णी, नितीन कोरगावकर, मंजिरी वाटवे आणि यतीन फाटक या कवी-कवयित्रींनी सहजीवनाच्या विविध छटा आपल्या कवितांमधून उलगडल्या. कवीसंमेलनाचे अध्यक्षस्थान श्रीकांत मोरे व सौ. शोभा मोरे यांनी भूषवले, तर सूत्रसंचालन सौ. श्रुती हजारे यांनी प्रभावीपणे केले.

### बदलत्या काळात नाती अधिक संवेदनशील : श्रीकांत मोरे

'सहजीवन' ही केवळ दोन व्यक्तींच्या एकत्र राहण्याची संकल्पना नसून दोन मनांची, विचारांची आणि प्रवासांची सुसंवादी सांगड आहे, असे मत श्रीकांत मोरे यांनी व्यक्त केले.

४० वर्षांच्या सहजीवनाकडे मागे वळून पाहताना त्यांनी हा प्रवास संघर्ष, समजूतदारपणा आणि विश्वास यांचा असल्याचे सांगितले. आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर एकमेकांना साथ देणे, चुका समजून घेणे आणि वेळोवेळी बदल स्वीकारणे हीच सहजीवनाची खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

ह्लनातं टिकवायचं असेल, तर 'मी'पेक्षा 'आपण' हा विचार महत्त्वाचा असतो,ह्व असे ते भावनिक शब्दांत म्हणाले. सौ. शोभा मोरे यांच्या सहकार्याशिवाय स्वतःची वाटचाल इतकी समृद्ध झाली नसती, याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

आजच्या बदलत्या काळात नाती अधिक संवेदनशील झाली असून त्यांना जपण्यासाठी संवाद आणि संयम अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगत, तरुण पिढीला सहजीवनाकडे जबाबदारी आणि जिवंत प्रवास म्हणून पाहण्याचा संदेश दिला.

# श्री विठ्ठल कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन व ऊस तोडणी वाहतूक कराराचा शुभारंभ



**वेणुनगर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि., वेणूनगर या कारखान्याचा सन २०२६ २०२७ हंगामातील मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम ह.भ.प. नवनाथ महाराज मोरे (मुंढेवाडी) यांचे शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी बोलताना कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत पाटील म्हणाले की, रोलर पुजन हा हंगामाचा वेग वाढविणारा पहिला कार्यक्रम असतो, मशिनरी दुरुस्तीची कामे वेळेत काळजीपूर्वक पुर्ण करुन सर्व अडचणी सोडवून कारखाना पुर्ण क्षमतेने यशस्वीपणे चालावा याची दक्षता आपण सर्वांनी घेतली पाहिजे, कारखान्याचे जास्तीत गाळप केल्यास आपल्याला कोणत्याही अडचणी येणार नाहीत. विठ्ठल कारखान्यामुळेच दराची स्पर्धा निर्माण होवून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर मिळत आहे. त्यामुळे येत्या गळीत हंगामामध्ये आपण पिकविलेला संपुर्ण ऊस आपल्या कारखान्यास गळीतास पाठवावा. संचालक मंडळ, सभासद, कामगार व तोडणी वाहतूक ठेकेदार ही चार चाके असून सर्वांनी एकत्रीत येवून हा गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडावा. गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गळीतास आलेल्या व श्री विठ्ठल कारखान्यामार्फत इतर कारखान्यास गळीतास गेलेल्या ऊसास रु.३००१ प्रमाणे ऊस पुरवठादार शेतकरी यांना रु.३१९ कोटीची सर्व बिले अदा केलेली आहेत, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार यांची तोडणी वाहतूक बिले अदा केलेले आहेत. साखरेच्या किमान विक्री मुल्य व एफ. आर.पी. यामध्ये तफावत असल्याने कारखान्यांना ऊसबिले अदा करताना अडचणींना सामोरे जावे लागते. पंजाब व इतर राज्यांनी एफ.आर.पी. अदा करणेसाठी रु.५०० अनुदान दिलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनानेही प्र.मे.टन रु.६०० प्रमाणे अनुदान द्यावे अशी मागणी केलेली आहे. तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचे फायनल पेमेंट ठरल्याप्रमाणे अदा केलेले आहे. ठरल्याप्रमाणे मागील थकीत पगार व इतर देणी देणेचे वाटप चालू केलेले आहे. सध्या कामावर असलेल्या कामगारांची ठरल्याप्रमाणे मागील थकीत पगार व इतर देणी लवकरच टप्पा टप्पाने रक्कम अदा करणेस संचालक मंडळ कटीबध्द आहे तसेच गळीत हंगाम २०२६-२०२७ साठी ऊस तोडणी वाहतूक कराराच्या अजार्चे विधीवत पुजन शेती कमिटीचे चेअरमन श्री दत्तात्रय नरसाळे व इतर मान्यवरांचे शुभहस्ते करून ऊस तोडणी व वाहतूक कराराचा आजपासून शुभारंभ करणेत आला. याप्रसंगी ह.भ.प. नवनाथ महाराज मोरे हे आपल्या अध्यात्मिक शैलीमध्ये विचार व्यक्त करताना म्हणाले की, श्री विठ्ठल कारखान्यामागे फार मोठी आध्यात्मिक शक्ती आहे. विठ्ठलचा सभासद शेतकरी व कामगार हा राजा आहे. त्यामुळे भविष्याचा विचार करुन हा राजवाडा टिकला पाहिजे अशी दुरदृष्टी असणारे कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत पाटील हे जनतेचे प्रश्न सोडविणेसाठी सतत प्रयत्नशिल असून त्यांचे मार्गदर्शनाखाली कारखाना निश्चित प्रगतीपथावर राहील, असे ते म्हणाले व पुढील गळीत हंगाम यशस्वी होणेसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कारखान्याचे संचालक मस्के यांनी केले व इतर मान्यवरांनी आपली मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन नितीन पवार ऊस पुरवठा अधिकारी यांनी केले. सदर प्रसंगी कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. प्रेमलता रोंगे, संचालक सर्वश्री कालिदास साळुंखे, सुरेश भुसे, बाळासाहेब हाके, नवनाथ नाईकनवरे, सचिन वाघाटे, सिध्देश्वर बंडगर, तायाप्पा गवळी, महेश खटके, विठ्ठलनाना रणदिवे तज्ञ संचालक दशरथ जाधव, अशोक तोंडले, निमंत्रीत संचालक श्री अंगद चिखलकर, धनाजी खरात, गणेश ननवरे, कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य व इतर मान्यवर, कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, सभासद, कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोककल्याणकारी योजना गरजूपर्यंत पोहचविणार - सभापती सौ. सातपुते





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेचा समाजकल्याण विभाग हा ग्रामीण जीवनातील योजनांचा अंमलबजावणी करणारा महत्वाचा विभाग आहे. या विभागाच्या लोककल्याणकारी योजना गरीब व गरजू लाभार्थ्यांपर्यत तसेच शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच दिव्यांग बंधु- भगीनी यांच्यापर्यत पोहोचविण्यासाठी हा विभाग सदैव तत्पर राहील त्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या सहकायार्ची भुमिका अतिशय महत्वाची आहे. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या समितीच्या समन्वय सभेमध्ये समाज कल्याण सभापती सौ. संस्कृती सातपुते यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहामध्ये आयोजीत करण्यात आलेल्या समाजकल्याण समितीच्या बैठकीमध्ये समाजकल्याण सभापती सौ. संस्कृती सातपुते या बोलत होत्या. यावेळी समाजकल्याण समिती मधील सदस्य तथा जिल्हा परिषद सदस्य सौ. सुप्रिया गायकवाड, सौ. सिंधुताई आलदर, सौ. करुणा शिवशरण, सौ. सविता उंबरजे, कु. श्रुती भोरगुंडे, सौ. तेजस्वीनी बोराडे, सौ. शिवानी स्वामी, प्रशांत पाटील, नंदकुमार वाघमारे, प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रसाद मिरकले, समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्यासह समाजकल्याण विभागातील जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी प्रारंभी उपस्थित सर्व जिल्हा परिषद सदस्य यांचा समाजकल्याण सभापती सौ. संस्कृती सातपुते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सदर बैठकीमध्ये जिल्हा परिषदेचा सन 2025-26 मध्ये 20% मागासवर्गीय कल्याण व 5% दिव्यांग कल्याण योजनाना सन 2026-27 मध्ये मुदतवाढ, सन 2026-27 मधील मुळ अंदाजपत्रकानुसार घेण्यात आलेल्या विविध योजनांतर्गत प्रशासकिय व तांत्रिक मान्यता, अनु-जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे योजनेतर्गत सन 2025-26 अंशतः काम बदल/ वस्ती बदल प्रस्तावास मान्यता, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करणेबाबत खर्चास जि. प. सेस 2026-27 मधुन तरतुदीस समाजकल्याण समितीची मंजूरी देण्यात आली. समाजकल्याण विभागाकडील विविध कार्यासन शिष्यवृत्ती , अनु. वस्तीगृह, जि प सेस. वृध्दाश्रम, अनु-जाती व नवबौध्द घटकांचा वस्त्यांचा विकास करणेबाबत सर्व योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. याबाबत सदर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली.

समता सप्ताह साजरा करताना जिल्हा स्तरावर अत्यंत बारकाईने सुंदर नियोजन केल्याबदल मा. सभापती यांनी समाजकल्याण अधिकारी श्री. मिरकले व विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे तसेच सचिन सोनकांबळे कार्यालयीन अधिक्षक व इतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले. तालुका स्तरावर देखील दजेर्दार चागंल्या वक्तृत्व स्पर्धा झालेल्या असुन तात्काळ त्याचे व्ही.डी.ओ. व यशोगाथा सादर करण्याबाबत सुचना करण्यात आल्या. समता पंधरवडा कार्यक्रमामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, संत गाडगेबाबा यांच्या पवित्र विचारांचा जागर झाला आहे. जिल्हा स्तरावर बक्षिस वितरण समारभ कार्यक्रम आयोजित करुन स्पर्धेतील 7 वी ते 12वी च्या विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानपुर्वक बक्षिस वितरण मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये करण्यात येणार आहे. यावेळी समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी विषयपत्रिकेवरील सर्व विषयांचा सविस्तर आढावा सभेपुढे दिला. योजना निहाय माहिती विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे व स्वाती गायकवाड यांनी दिली.

# दर्गनहळ्ळी ग्रामपंचायतीवर पुन्हा एकदा भाजपाची सत्ता

## शिवा विश्वनाथ गायकवाड यांचा 167 मतांनी दणदणीत विजय



**दक्षिण सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दर्गनहळ्ळी ग्रामपंचायत सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत अनुसूचित जाती प्रवगार्तून भाजप समर्थित उमेदवार शिवा विश्वनाथ गायकवाड यांनी तब्बल 167 मतांनी शानदार विजय संपादन करत प्रतिस्पर्धी कल्लाप्पा भिवा चतुरभूज यांचा पराभव केला.

या दणदणीत विजयामुळे दर्गनहळ्ळी ग्रामपंचायतीवर पुन्हा एकदा भाजपाची सत्ता कायम राहिली असून गावात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. निकाल जाहीर होताच समर्थक, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी जल्लोष करत विजय साजरा केला. फटाक्यांची आतषबाजी, गुलाल उधळण आणि अभिनंदनाच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

नवनिर्वाचित सरपंच शिवा विश्वनाथ गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गावाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. गावातील सर्व समाजघटकांना सोबत घेऊन विकासकामांना प्राधान्य देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या विजय सोहळ्यावेळी भाजपा युवा मोचार्चे जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार, शंकर बिराजदार, नवराज होनमुर्गीकर, विनोद बिराजदार, बद्रीनाथ बिराजदार, मल्लिनाथ बिराजदार बाबुगोळ, चन्नवीर होनमुर्गीकर, सोमनाथ सरसबे, माणिक नुले, सुनील पाटील, जगदीश होनमुर्गीकर, मल्लिनाथ केगावकर, पंकज माळी, शराणाप्पा पाटील, राहुल कांबळे, तानाजी सलावदे, परमेश्वर पाटील, सिद्धाय्या स्वामी, सागर बिराजदार, वर्धशंकर कोळी, संजय होनमुर्गीकर, गंगाराम पाटील, अमोल बिराजदार आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी शिवा गायकवाड यांचे अभिनंदन करत हा विजय गावातील एकजूट, विश्वास, विकास आणि भाजपाच्या कार्यपद्धतीवरील जनतेच्या विश्वासाचा विजय असल्याचे सांगितले.

दर्गनहळ्ळी ग्रामपंचायतीवरील हा विजय आगामी काळात गावाच्या प्रगतीसाठी महत्वपूर्ण ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे : आ. खरे



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांच्या अडचणी प्रत्यक्ष समजून घेऊन त्यांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात. पीक विमा योजनेअंतर्गत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे. कोणताही पात्र शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना आमदार राजू खरे यांनी दिल्या.

खरीप हंगाम २०२६-२७च्या पार्श्वभूमीवर मोहोळ येथील कृषी विज्ञान केंद्रात कृषी विभागाची आढावा बैठक आ. खरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, अलीकडील काळात अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर त्यांना तातडीने दिलासा मिळणे आवश्यक आहे. तसेच अनेक ठिकाणी बंद असलेली हवामान व पर्जन्यमान मोजणी यंत्रे तात्काळ कार्यान्वित करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीत खरीप हंगामात शेतकऱ्यांचे उत्पन्न कशा प्रकारे वाढवता येईल, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सुधारित बियाणे, सिंचन व्यवस्थापन, संतुलित खतांचा वापर तसेच कीड व रोग नियंत्रण यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले.

कृषी विभागामार्फत विविध योजनांद्वारे शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व शेतीसाठी आवश्यक अवजारे उपलब्ध करून दिली जात असून, यातील प्रातिनिधिक शेतकऱ्यांना अवजारे वितरीत करण्यात आली. तसेच विविध स्पर्धांमधील गुणवंत शेतकऱ्यांचा सन्मानही करण्यात आला. हे उपक्रम ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारे असल्याचे आ. खरे यांनी नमूद केले.

कार्यक्रम समन्वयक डॉ. तानाजी वळकुंडे, तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे, रामचंद्र माळी व काजल म्हात्रे यांनी ह्यसंतुलित खत व्यवस्थापनह्ल या विषयावर मार्गदर्शन केले. बैठकीस तालुक्यातील शेतकरी, कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाची बैठक संपन्न



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शिवपुत्र धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळ, सोलापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीस शिव-शंभू भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

या वेळी २०२६ सालच्या जयंती उत्सवासाठी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी रोहित नलवडे यांची निवड करण्यात आली असून, उपाध्यक्षपदी करण मोरे व दिपक डोंगरे, कार्याध्यक्षपदी समर्थ बिराजदार, तर नियोजन प्रमुखपदी वीरेश कलशेट्टी यांची निवड करण्यात आली.

उत्सव नियोजनासंदर्भात बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मिरवणुकीत ह्य१ बेस, १ टॉप क्लीन साऊंडह्ल वापरण्याचे आवाहन करण्यात आले. पारंपारिक पद्धतीने मिरवणूक काढू इच्छिणाऱ्या मंडळांना परवानगी देण्यात आली. तसेच पोलीस प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले.

संस्थापक राम जाधव यांनी '१८ पगड जातींचे शिव-शंभू भक्त एकत्र येऊन जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करूया. मध्यवर्ती महामंडळ प्रत्येक मंडळाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे,' असे मनोगत व्यक्त केले.

यावेळी सोमनाथ राऊत, श्याम कदम, मल्लू सलगर यांनीही आपले विचार मांडले. बैठकीस राजाभाऊ आलुरे, बंटी रोडगे, विक्रांत जाधव, महेश जगदाळे, पंकज काटकर, गणेश कदम, अमोल झाडगे, निलेश शिंदे तसेच विश्वस्त अभिजीत बंटी सोनके, निशांत सावळे, राहुल दहिहंडे, अजिंक्य पाटील, हरिभाऊ सावंत, राजाभाऊ गेजगे, पवन आलुरे, संदीप चेळेकर, नागेश भोसले, सूरज पाटील, राज पवार, राज शिंदे, अजय देवकर, अजिंक्य शिंदे, सोहम शेळके आदींसह असंख्य शिव-शंभू भक्त उपस्थित होते.

# चिमुकल्याला काखेत घेऊन यात्रेत चोरी

## दोन महिला जेरबंद, तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांच्या यात्रेत महिलांचे दागिने चोरणाऱ्या दोन महिलांना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद करत तीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

गड्डा यात्रेदरम्यान निता काळे (वय ४५, रा. शिरापूर रोड, लोकमंगल कारखान्याजवळ, ता. मोहोळ) ही महिला लहान मुलाला काखेत घेऊन गर्दीत महिलांचे लक्ष विचलित करून त्यांच्या गळ्यातील व पर्समधील दागिने लंपास करत होती. तिने साडेनऊ ग्रॅमचे चांदीचे ब्रेसलेट व सहा हजार रुपये चोरल्याचे उघड झाले आहे. तिच्याविरुद्ध मोहोळ पोलिस ठाण्यातही चोरीचा गुन्हा दाखल असून २६ एप्रिल रोजी तिला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तिने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तिच्याकडून दागिने व रोकड जप्त केली.

दरम्यान, दुसऱ्या घटनेत नात्यातील विवाहासाठी आलेल्या महिलेनेच विश्वासघात करत तीन लाख रुपयांचे दागिने लंपास केल्याचे समोर आले. जलकर कुटुंबीयांच्या घरी लग्नसमारंभासाठी आलेल्या या महिलेने पहाटेच्या सुमारास झोपलेल्या महिलेच्या उशीखालून दागिन्यांची पर्स चोरून नेली. दागिने गायब झाल्याचे लक्षात आल्यानंतर जलकर यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी संशयित महिलेचा शोध घेऊन तिला ताब्यात घेतले असता तिने गुन्ह्याची कबुली दिली. मोनिका रोहिटे (रा. लहान थोबडे वस्ती, सोलापूर) असे तिचे नाव आहे.

या दोन्ही कारवाया पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त गौहर हसन, सहाय्यक पोलीस आयुक्त मच्छिंद्र पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या नेतृत्वात पार पडल्या. या मोहिमेत पोलिस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड व त्यांच्या पथकातील अंमलदार नंदराम गायकवाड, वजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, अजिंक्य माने, महिला अंमलदार सुमित्रा बारबोले, निलोफर तांबोळी तसेच चालक बाळू काळे व सतीश काटे यांनी सहभाग घेतला.

# अक्कलकोट तालुक्यात डिजीटल जनगणनेस 1 मे पासून शुभारंभ

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** केंद्र व राज्य शासनाच्या निदेर्शानुसार अक्कलकोट तालुक्यात दि.01 मे, 2026 पासून डिजीटल जनगणना मोहमेला प्रारंभ होणार आहे. 2027 साली होणारी ही जनगणना पूर्णपणे डीजीटल पध्दतीने पार पडणार असून तालुक्यातील प्रथमच अशा स्वरूपात ही प्रक्रिया राबविली जात आहे. जनगणनेचा पहिला टप्पा दि.01 मे, 2026 ते दि. 15 मे 2026 या कालावधीत होणार असून त्यादरम्यान नागरिकांना स्वयंनोंदणीची सुविधा देण्यात आलेली आहे. नागरिकांनी https://se.census gov.in या संकेतस्थळावर जाऊन 34 प्रश्नांची माहिती भरावयाची आहे. नोंदणी पूर्ण झालेनंतर मिळणारा युनिक कोड पुढील टप्प्यात प्रगणकाला देणे आवश्यक आहे. दुसऱ्या टप्प्यात दि. 16 मे 2026 ते दि. 14 जून, 2026 या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील. स्वयंनोंदणी केलेल्या नागरिकांना केवळ युनिक कोड देऊन प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. या जनगणेत नागरिकांची वैयक्तीक माहिती, कुटूंब रचना, घरचा प्रकार, सदस्याची संख्या तसेच घरातील उपलब्ध सुविधा याचा तपशिल गोळा करणेत येणार असून सदरची माहिती केवळ सांख्यिकीक हेतूसाठी वापरली जाणार असून गोपनियतेची पूर्ण हमी देण्यात आली आहे. दरम्यान तालुकास्तरावर पर्यवेक्षक व प्रगणक यांचे प्रशिक्षण सुरू आहेत. सदर जनगणनेचे प्रत्यक्ष कामकाज करणेकरीता अक्क्लकोट तालुक्यातील 68 पर्यवेक्षक व 418 प्रगणकांची नियुक्ती करणेत आलेली आहे. भारतात जनगणनेची परंपरा 1872 पासून सुरू असून यंदाची जनगणना स्वातंत्र्यपूर्व काळापासूनची सोळावी व स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना ठरणार आहे. त्याअनुषंगाने अक्कलकोट तालुक्यातील नागरिकांना आवाहन करणेत येते की, जनगणनेच्या कामकाजाकरीता नियुक्त प्रगणक आपले घरी आलेनंतर त्यांना आपली वैयक्तीक माहिती देऊन सहकार्य करावे. तसेच स्वजनगणना सुविधेचा लाभ घेऊन जनगणनेच्या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे.